**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
सुविड फाउंडेशन, रिसोड
वाशिम

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 14-02-2025**

**वॉशिम(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-02-14 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-02-15 | 2025-02-16 | 2025-02-17 | 2025-02-18 | 2025-02-19 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 36.2 | 36.4 | 36.5 | 35.7 | 35.6 |
| किमान तापमान (अं.से) | 20.2 | 20.5 | 20.6 | 19.8 | 20.6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 46 | 48 | 52 | 47 | 49 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 35 | 36 | 34 | 35 | 35 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 11 | 12 | 10 | 8 | 9 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 315 | 89 | 255 | 282 | 310 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 0 | 1 | 0 | 0 | 1 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• वाशीम जिल्ह्यात भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार पुढील ५ दिवस आकाश निरभ्र राहून वातावरण कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •पुढील ५ दिवसा दरम्यान कमाल तापमान ३५.६ ते ३६.५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १९.८ ते २०.६ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पुढील ३ दिवस किमान तापमानात ३ ते ५ अंश सेल्ससअसने वाढ होईल त्यानंतर विदर्भात फारसा बदल होणार नाही पुढील ३ दिवस कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्ससअसने वाढ त्यानंतर विदर्भात फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

•हंगामी पिके ,फळपिके व भाजीपाला पिकामध्ये आवशकता असल्यास ठिबक सिंचन/तुषार पद्धतीद्वारे ओलीत करावे. •हंगामी पिके ,फळपिके व भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी) कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे उभ्या पिकामध्ये खाते देण्याची कामे सुरु ठेवावीत.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

•उन्हाळी तीळ पिकाची पेरणी १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण करावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| करडई | •करडई पिकात दाने भरण्याच्या अवस्थेत पेरणीपासून ८० दिवसांनी पिकाला पाण्याचा पडू देउ नये. ओलीत करतेवेळी पाणी शेतात साचणार नाही याची काळजी घ्यावी. |
| ज्वारी | •वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या रब्बी ज्वारी पिकाची काढणी करून घ्यावी. काढणीनंतर ८ ते १० दिवस उन्हात वाळवून मळणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | •हरभरा परिपक्वतेच्या काळात घाटे आणि पाने पिवळी पडत असताना ओलीत बंद ठेवावे.जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी वेळेवर पेरणी केलेले हरभरा पीक परिपक्व झाल्याचे आढळून आले आहे,तरी शेतकऱ्यांनी पिकाची कापणी करून घ्यावी व २-३ दिवस उन्हात वाळवून नंतर मळणी करावी.सद्यस्थितीत कोरडे हवामान असल्यामुळे परिपक्व झालेले पिक कापणीस उशीर झाल्यास घाटे तुटून पडल्याने उत्पादनात घट होऊ शकते. •उशिरा पेरणी झालेल्या हरभरा पिकाला दाणे भरण्याच्या अवस्थेत पिकाला पाण्याचा ताण पडू देउ नये. ओलीत करतेवेळी शेतात साचणार नाही याची काळजी घ्यावी. |
| गहू | • गहू पिकला सिंचनाच्या महत्वाच्या टप्प्यांवर म्हणजे फुल अवस्था (६५-७० दिवस ), दाणा भरण्याची अवस्था (८०-८५ दिवस ) आणि दाना परिपक्व अवस्था ९५-१०० दिवस ) ला ओलीत करावे. •गव्हामध्ये उंदीर व्यवस्थापनासाठी विषारी अमिषाचा वापर करावा. विषयुक्त आमिष तयार करण्यासाठी धानाचा भरडा ४९ भाग थोडे गोड तेल व एक भाग ब्रोमाडीओलोन ०.२५ टक्के सीबी एकत्र मिसळावे. चमचाभर अमिष प्लास्टिकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळाजवळ ठेवावे. |
| तीळ | •उन्हाळी तीळ पिकाची पेरणी १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण करावी. या करिता ए.के.टी-१०१ किंवा पी. के. व्ही एन .टी -११ या पैकी एका वाणाची निवड करावी तसेच पेरणी करिता हेक्टरी ३ ते ४ किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्व बियाण्यास ट्रायकोडर्मा विरीडी ४ ग्रम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. दोन ओळीतील अंतर ३० सेमी दोन झाडातील अंतर १० ते १५ सेमी ठेवावे. रासायनिक खत २५:२५:० नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टरी वापरावे.नत्राची मात्र पेरणीच्या वेळी अर्धी द्यावी तसेच पेरणीनंतर एक महिन्यांनी अर्धी मात्रा द्यावी. • पेरणी केलेल्या तीळ पिकाची पाहणी करावी व गरज असल्यास उगवण झाल्यानंतर ७ ते ०८ दिवसानंतर नांगे भरणी करून घ्यावी जेणे करून हेक्टरी झाडांची योग्य संख्या राखली जाईल. • जमिनीच्या मगदुरा प्रमाणे तीळ पिकाला ओलीत करावे तसेच ओलीत करतांना पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. • उन्हाळी तीळाची उगवणीनंतर १० ते १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एकच जोमदार रोपटे ठेवावे .विरळणीस जास्त उशीर करू नये. विरळणी योग्य वेळी केल्याने हेक्टरी रोपांची अपेक्षित संख्या राहून उत्पादन चांगले मिळते |
| भुईमूग | •उन्हाळी भुईमुग पीकात अवश्यकतेनुसार व पिकाच्या गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. •भुईमुग पिक वाढीच्या सुरुवातीच्या ६ ते ७ आठवडे कालावधी मध्ये आंतरमशागत करून शेत भूसभुशीत ठेवण्याकरीता आवशकते नुसार निंदणी आणी डवरणी/कोळपणी करा. •भुईमुग तण व्यवस्थापन: तणनाशकाच्या सहाय्याने तन व्यवस्थापन करावयाचे असल्यास उगवणपश्चात पेरणीनंतर २५ ते३० दिवसांनी क्विझालोफॉप इथाईल ५ ईसी१०० ग्राम क्रियाशील घटक किंवा इमाझीथायपर १० % एसएल १०० ग्राम क्रियाशील घटक यापैकी कोणत्याही एका तणनाशकाची प्रती हेक्टर ६०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हळद | •हळद पिकाची काढणी जातीनुसार पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणीपुर्वी जमिनीच्या प्रतीनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. |
| कांदा | • पिकाची पाण्याची गरज, जमिनीचा प्रकार व सध्याचे हवामान लक्षात घेऊन कांदा पिकामध्ये ओलिताचे नियोजन करावे. तसेच पिकामध्ये आवश्यकतेनुसार रस शोषक किडींचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी क्वीनॉल्फॉस २५ टक्के प्रवाही या कीटकनाशकाची१२ मिली मात्रा प्रती१०लिटर पाण्यात मिसळून फवारणीकरावी. •लागवडीनंतर ३० दिवसांनी ३५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा पहिला हप्ता द्यावा. • लागवडीनंतर ४५ दिवसांनी ३५ किलो/हेक्टर या प्रमाणात नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. |
| संत्रा | • संत्रा पाणी व्यवस्थापन: तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला ९ ते ४० लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ६० ते ९६ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १०८ ते १३७ लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे. • बगीच्यामध्ये पाणी दिल्या बरोबर तुटतो आणि नवीन पालवी किंवा नवतीची सुरवात होते . ते याच वेळी सिट्रस सिल्ला व त्याची पिल्ले पांनातून रस शोषण करतात. नवतीच्या पानाची गळ होऊन फांद्या सुकतात व फळ धारणेवर अनिष्ठ परिणाम होतो. ह्या कीडी मुळे (ग्रीनिंग ) रोगाचा प्रसार होतो. जर नियंत्रण केले नाही तर झाडावरील फूल आणि फळे गळून पडतात आणि झाडावर फळे येत नाहीत. ह्या किडीमुळे १०० टक्के पर्यंत नुकसान होते. ते सायलाच्या नियत्रणाकरिता झाडावर डायमेथोएट २ मि.लि किंवा अबामेक्टिन ०.४२ मि. लि किंवा नोवारुलान ०.५५ मि. लि किंवा एसिफेट २ ग्रॅम किंवा इमिडाक्लोरोपीड ०.५० प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी दुसरी फवारणी १० दिवसानंतर आलटून पालटून करावी. खोडकिडा किंवा ईंदरबेला किंवा साल खाणारी आळीच्या बंदोबस्ताकरिता, अळीच्या छिद्रावरुण जाळे काढावे व इंजेक्शन च्या मदतीने |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | डायक्लोरोव्हास ७६ ई .सी . ५ मि. लि. प्रती लिटर पाण्यात मिसळून छिद्रात टाकावे आणि कापसाचा बोळा या द्रवणात बुडवून छिद्र बंद करावे. • मृगबहाराच्या संत्रा झाडे परिपक्व होण्याच्या १०-१५ दिवस आधी झाडाचे ओलीत करायचे थांबवावे, परिपक्व फळे प्रत वारीनंतर योग्य प्रकारे निवडून बाजारात आणावीत. |
| वांगे | • वांगीपिकास ८ ते१० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे दोन ओलीतातील अंतर कमी जास्त करावे. पिक निरोगी व स्वच्छ राहण्यासाठी कोळपणी व निंदनी करून जमीन तन विरहित ठेवावी . |
| टोमॅटो | •टोमॅटो पिकामध्ये करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी मॅनकोझेब ७५ डब्लूपी.२५ ग्राम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी. २५ ग्राम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्रावे दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावे. |
| मिरची | •मिरची पिकात रस शोषण करणाऱ्या किडींच्या प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन १०टक्के ईसी ४ मीली किंवा फेनप्रोपाथ्रीन १०टक्के ईसी ४ मीली प्रती १० लिटर पाण्यात मीसळून फवारणी करावी.• मिरची लागवड करून एक महिना पूर्ण झालेल्या उत्पादकांनी मिरची पिकाला ३७.५ किलो नत्र प्रतीहेक्टरी द्यावे.• फुलांची गळ कमी करण्यासाठी प्लॅनोफिक्स ५ मि.ली., ९ लिटर पाण्यात मिसळून मिरचीलागवडीनंतर ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.• मिरचीवरील फुलकिडीच्या व्यवस्थापनासाठी निळे चिकट सापळे लावावेत.आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास इमामेक्टीन बेंझोएट एस.जी.@४ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी |
| टरबूज | •टरबूज/खरबूज च्या लागवडीनंतर पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी २-३ निन्दन द्यावे. • टरबूज/ खरबूज पिकास लागवडीनंतर ३० दिवसांनी नत्राचा उर्वरित नत्राचा हप्ता(४० किलो नत्र प्रती हेक्टर)द्यावा. • तापमानातील वाढ व पिकाची गरज लक्षात घेतादर ६ ते८ दिवसांनी ओलीत करावे.जमिनीचा मगदूर व पिकाची गरज यानुसार दोन ओलीतातील अंतर कमी जास्त करावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांना पायखुरी व तोंडखुरी रोगाची प्रतिबंध लस पशु दवाखान्यात नेऊन टोचावी जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे. पाण्याची उपलब्धता असल्यास पशुधनाच्या हिरव्या चाऱ्यासाठी चार पिकाची पेरणी करावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | कोंबड्यांच्या सर्व पिल्लांना खाद्य समान मिळेल यासाठी खाद्याचे भांडे दिवसातून दोन वेळा भरून ठेवावे.दर सहा महिन्यातून एकदा मानमोडी प्रतिबंधक लस टोचून घ्यावी. लसीचा ताण येत असल्यामुळे ताण कमी करण्यासाठी स्ट्रेसवेल किंवा व्हायमेरॉल औषध ३ मिलि प्रती१०० पक्षी या प्रमाणात पिण्याच्या पाण्यामधून द्यावे. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | •हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |